**आकाशवाणी मुंबई**
**प्रादेशिक बातम्या देत आहे.**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज राजस्थानच्या दौऱ्यावर आहेत. आज सकाळी जोधपूर इथं एका कार्यक्रमात त्यांनी ५ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी केली. जोधपूर आयआयटी चा नवीन परिसर आणि अनेक महामार्ग यांचा त्यात समावेश आहे. राजस्थानातल्या दोन नवीन रेल्वेगाड्यांनाही प्रधानमंत्र्यांनी हिरवा झेंडा दाखवला.

राजस्थानच्या जनतेसाठी केंद्रसरकार अनेक योजना राबवत असून काँग्रेस सरकारने आजवर फक्त भ्रष्टाचारच जनतेच्या झोळीत टाकला अशी टीका मोदी यांनी जाहीर सभेत केली.

**<><><><><>**

केंद्रीय भूविज्ञान मंत्री किरेन रिजिजू यांनी सातारा जिल्ह्यातल्या महाबळेश्वर मधल्या 'हाय अल्टिट्यूड क्लाउड फिजिक्स' प्रयोगशाळेला भेट देऊन पाहणी केली. ही प्रयोगशाळा पुण्यामधल्या भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्थेची शाखा म्हणून कार्यरत आहे. हे केंद्र प्रामुख्यानं मान्सूनच्या पावसाशी संबंधित ढगांच्या हालचालींचा अभ्यास करतं. आपल्या भेटीदरम्यान रिजिजू यांनी केंद्रातल्या विविध विभागांची पाहणी करून तिथल्या कामाची माहिती घेतली, आणि केंद्रामधल्या शास्त्रज्ञांशी अनौपचारिक संवाद साधला.

**<><><><><>**

नांदेड शासकीय रुग्णालयात मृत्यू झालेल्यांची संख्या आता ४१ वर पोहोचली असून यात तब्बल २२ बालकांचा समावेश आहे. या प्रकरणी डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, आणि रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. एस.आर. वाकोडे यांच्यासह बालरोग विभागातल्या डॉक्टरवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली आहे. या रुग्णालयात सध्या ८२३ रुग्ण दाखल असून, २५ हून अधिक बालकं अत्यवस्थ असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

<><><><><>

चित्रपट प्रदर्शनासाठी आवश्यक प्रमाणपत्र देण्याकरता लाच घेतल्याप्रकरणी सीबीआयनं काही जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. यात ३ व्यक्ती आणि CBFC, अर्थात केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाच्या काही अधिकारी-कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. हिंदीत डब करण्यात आलेल्या एका चित्रपटाला सप्टेंबर २०२३ मध्ये सेन्सॉर बोर्डाकडून प्रमाणपत्र मिळवण्यासाठी ७ लाख रुपयांची लाच स्वीकारल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. याप्रकरणी मुंबईसह ४ ठिकाणी सीबीआयनं छापे टाकले असून काही कागदपत्र गोळा केली आहेत.

<><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेसचे लोकसभेतले खासदार पी. पी. फैजल यांना सदस्यत्वासाठी अपात्र घोषित करण्यात आलं आहे. हत्येचा प्रयत्न केल्याच्या गुन्ह्याप्रकरणी फैजल यांना सुनावण्यात आलेली शिक्षा स्थगित करण्यास केरळ उच्च न्यायालयानं नकार दिल्यानं हा निर्णय घेण्यात आल्याचं लोकसभा सचिवालयानं म्हटलं आहे. लक्षद्वीप मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून

आलेले फैजल यांचं सदस्यत्व त्यांना शिक्षा झालेल्या दिवसापासून म्हणजे यावर्षी ११ जानेवारीपासून रद्द करण्यात आल्याचं लोकसभा सचिवालयानं स्पष्ट केलं आहे.

<><><><>

हाँगझो आशियाई क्रीडा स्पर्धांमधे आज तिरंदाजीच्या सांघिक प्रकारात ओजस देवतळे, प्रथमेश जावकर आणि अभिषेक शर्मा यांच्या चमूनं कोरियाच्या संघाचा २३५ विरुद्ध २३० असा पराभव करुन सुवर्णपदक मिळवलं. ज्योती सुरेखा वेण्णम, प्रणित कौर आणि अदिती गोपीचंद यांच्या महिला संघानेही तिरंदाजीत सुवर्णपदक मिळवलं.  स्क्वॅशमधे मिश्रगटात दीपिका पल्लिकल आणि हरिंदर संधू यांच्या जोडीने मलेशियाच्या जोडीचा २-० असा पराभव करुन सुवर्णपदकाला गवसणी घातली. भारताच्या पुरुष कबड्डी संघाने ग्रुप ए च्या सामन्यात तैवानचा ५० विरुद्ध २७ गुणांनी पराभव केला. भारताचा पुढचा सामना आता जपानबरोबर होणार आहे. ८३ पदकांसह भारत पदक तालिकेत चौथ्या स्थानावर आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत ही भारताची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे.

<><><><>

एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धा आज अहमदाबादच्या नरेंद्र मोदी क्रिकेट मैदानावर सुरू झाली. इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातला पहिला सामना  सुरु झाला असून न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्यचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा इंग्लंडच्या एकही गडी न गमावता २० धावा झाल्या होत्या.

भारताचा पहिला सामना रविवारी आठ ऑक्टोबर रोजी चेन्नईच्या एमए चिदंबरम मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातला सामना येत्या १४ ऑक्टोबरला अहमदाबाद इथं होणार आहे.

**<><><><><>**

'मेरी माटी, मेरा देश' अभियानांतर्गत यवतमाळ नगरपरिषदेनं तयार केलेला अमृत कलश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना सुपूर्द करण्यात आला. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी इतर अधिकारी, कर्मचारी, नगरपरिषदेचे शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी या कलशाची शोभायात्रा काढली.

**<><><><><>**

जनसामान्यांच्या समस्या आणि अडचणी समजून घेण्यासाठी त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचं, तसंच संघटित होऊन एकत्र येण्याचं आवाहन राज्याचे सहकार मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते दिलीप वळसे पाटील यांनी केलं आहे. अकोला इथं राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत ते काल बोलत होते.

**//<><><><><>//**